आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ जुलै  २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा
- टीईटी पेपरफुटी प्रकरणातल्या दोन सूत्रधारांना बिहारमधून अटक
- राज्यात सर्वत्र देवशयनी आषाढी एकादशीचा उत्साह, मुख्यमंत्र्याच्या हस्ते पंढरपुरात शासकीय महापूजा संपन्न

**आणि**

- जागतिक कनिष्ठ स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंगची अंतिम फेरीत धडक

<><><><><>

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. भारताचे तरुण हेच या देशाची खरी ताकद आहेत आणि त्या ताकदीला कुणी संभ्रमित करू नये हाच आपला संकल्प आहे. जंतर मंतरवरचं आंदोलन आणि देशातली एकंदर परिस्थिती पाहता याचा फायदा देशविरोधी घटकांनी घेऊ नये तसंच विद्यार्थ्यांनी आपला वेळ आणि ताकद आपली कारकिर्द घडवण्यासाठी लावावी या उद्देशाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे राजीनामा सुपूर्द करत असल्याचं प्रधान यांनी म्हटलं आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणासह अन्य मागण्यांसाठी गेल्या काही दिवसांपासून नवी दिल्लीत जंतर मंतरवर कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती.

<><><><><>

टीईटी अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातले मुख्य सूत्रधार मानले जाणारे बिजेंद्र कुमार गुप्ता आणि इंद्रजीत सिन्हा यांना भिवंडी पोलिसांनी बिहारमधून अटक केली आहे. याआधी, या प्रकरणात १२ आरोपींना अटक झाली होती. या कारवाईनंतर या प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या १४ वर पोहोचली आहे. प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.

<><><><><>

राज्यात आज सर्वत्र देवशयनी आषाढी एकादशीचा उत्साह आहे. पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीनिमित्त आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यंदाचे मानाचे वारकरी धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माने आणि प्रभावती माने यांनीही मुख्यमंत्र्यांसोबत विठूरायाची पूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीनं त्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सुख-समृद्धीसाठी, शेतकऱ्यांच्या भरभराटीसाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या मंगलमय जीवनासाठी विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली.

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिर परिसर विकासाचं काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही, सर्वांचं योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. आषाढी वारीनिमित्त पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचं मंदिर विविध रंगीबेरंगी फुलांनी आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलं आहे.

आषाढी एकादशीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. भक्ती, करुणा आणि सेवाभावाचा शाश्वत संदेश देणारा हा पवित्र दिवस प्रत्येकाच्या जीवनात आनंद, सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो, अशी त्यांनी विठ्ठल चरणी प्रार्थना केली. प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणासाठी आणि सन्मानासाठी अखंड सेवाभावाने कार्य करण्याचा संकल्प अधिक दृढ होवो, अशी प्रार्थनाही मोदी यांनी केली.

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त आज सकाळपासून राज्यभरातल्या विठ्ठल मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

**मुंबई**त वडाळा इथल्या विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी उत्साहात साजरी होत आहे.

**रत्नागिरी** शहरातल्या मारुती मंदिरापासून विठ्ठल मंदिरापर्यंत वारी काढण्यात आली. 'एक घर-एक तुळस' या संकल्पनेवर आधारित उपक्रम राबवण्यात आला. धार्मिक श्रद्धा, पर्यावरण संवर्धन आणि भारतीय संस्कृती यांचा संगम असलेल्या या उपक्रमांतर्गत भाविकांना तुळशीच्या ३५० रोपांचं वाटप करण्यात आलं.

**बीड** शहरासह जिल्ह्यात अकराही तालुक्यांमध्ये विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. विविध शाळांमध्येही बालगोपाळांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत आणि वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी काढली.

**भंडारा** शहरात २ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी वारी काढली. तसंच गांधी चौकात एकत्र येत विद्यार्थ्यांनी रिंगण घातलं.

**बुलढाणा** जिल्ह्यात प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगाव इथं श्री संत गजानन महाराज समाधी मंदिराचा परिसर आज पहाटेपासूनच गण गण गणात बोते या जयघोषानं दुमदुमून गेला आहे. शेजारच्या राज्यातूनही हजारो वारकरी आणि भाविक शेगावात दाखल झाले आहेत. मंदिर परिसरात आणि शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**धुळे** शहरात तसंच जिल्ह्यातल्या विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. अभिषेक, महापूजा, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजरामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झालं आहे.

**<><><><><>**

कॅनडात ओंटारियो इथे सुरू असलेल्या जागतिक कनिष्ठ स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेत भारताची स्क्वॉशपटू अनाहत सिंगने उपांत्य फेरीत इजिप्तच्या बार्ब सामेहचा ३-१ असा पराभव करून महिला एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. अंतिम सामन्यात आता तिचा सामना इजिप्तच्या रुकय्या सालेमशी होणार आहे. हा सामना आज रात्री साडेदहा वाजता सुरू होईल. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी अनाहत ही दुसरी भारतीय खेळाडू ठरली आहे.

**<><><><><>**

स्कॉटलंड इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दिव्यांगांच्या पुरुष भारोत्तोलन प्रकारात झंडू कुमारने कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकांचं खातं उघडलं.

या स्पर्धेत भारताच्या मुष्टियुद्ध खेळांची दमदार सुरुवात झाली. भारताची मुष्टियोद्धा लवलीना बोर्गोहेनला महिलांच्या ७५ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत थेट प्रवेश मिळाल्यामुळे तिचं कांस्यपदक निश्चित झालं आहे.

जादुमणी सिंगने सलामीच्या फेरीत दमदार विजय मिळवत पुरुषांच्या ५५-किलो वजनी गटातील 'राउंड ऑफ १६' मध्ये धडक मारली.

भारताचे 'लॉन बॉल्स' संघही चांगली कामगिरी करत आहेत. महिला दुहेरीत रूपा राणी तिर्की आणि पिंकी सिंग यांच्या जोडीनं दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून सलग दुसरा विजय नोंदवला आणि 'गट ब'च्या गुणतालिकेत अव्वल स्थान गाठलं. पुरुषांच्या एकेरी प्रकारात पुतुल सोनोवालने आपली विजयी घोडदौड कायम राखत अपराजित राहण्याची कामगिरी केली.

<><><><><>

हरारे इथं आज झिम्बाब्वेविरुद्ध भारताचा टी- ट्वेंटी क्रिकेटचा दुसरा सामना होणार आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत भारताने १-० ने आघाडी घेतली आहे. दुपारी साडे चार वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यात बोरगाव इथं आज सकाळी ९ वाजून ५५ मिनिटांपासून आतापर्यंत भूकंपाचे चार धक्के जाणवले आहेत. हे धक्के सौम्य क्षमतेचे असून त्यामुळे कोणतीही जीवित तसंच मालमत्ता हानी झाली नसल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><><><>

सोलापुरात नीरा नदीच्या खोऱ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे वीर धरण शंभर टक्के भरलं असून नीरा नदीत २५ हजार क्युसेक विसर्ग सुरु केला आहे. वारकऱ्यांना तसंच भिमा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हा विसर्ग नीरा नदीतून भिमा नदीला मिळत असून  आज दुपारनंतर पंढरपूर इथं चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता असल्यानं भिमा नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. पंढरपूर शहर आणि परिसरात आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांची मोठी गर्दी असल्यानं प्रशासन आणि लाभ क्षेत्र प्राधिकरणानं सावधानतेचा इशारा दिला आहे.

पालघर जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे बाधित झालेल्या तलासरी तालुक्यातल्या कोसबपाडा आणि दुबळपाडा या गावांना पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या

अडचणी जाणून घेतल्या आणि प्रशासनाला तातडीने मदत आणि पुनर्वसनाच्या उपाययोजना राबवण्याच्या सूचना दिल्या.

<><><><><>

ओडिशामध्ये पुरी इथे संध्याकाळी सुना बेश विधी होणार आहे. या संपूर्ण रथयात्रेतला सर्वात भव्य विधींपैकी एक मानल्या जाणाऱ्या या विधीसाठी देशविदेशातून लाखो भाविक मुख्य यात्रा मार्गावर जमण्याची शक्यता आहे. हा सोहळा सुरळीतपणे व्हावा यासाठी सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी सोयी केल्या आहेत.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे सलग सहा दिवस बंद असलेल्या वैष्णो देवी यात्रेला आजपासून पुन्हा सुरुवात झाली. हवामानाचा आढावा घेतल्यानंतर यात्रेचा मार्ग भाविकांसाठी सुरक्षित असल्याचं घोषित करण्यात आलं असल्याची माहिती आमच्या जम्मूतल्या प्रतिनिधींनी दिली. मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे ही यात्रा स्थगित केली होती. यात्रेकरुंनी देवस्थान समिती आणि सुरक्षा यंत्रणांच्या सूचनांचे पालन करावे आणि हवामानाची माहिती घेत राहावी, असा सल्ला देण्यात आला आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरातल्या खराब हवामानामुळे स्थगित असलेल्या अमरनाथ यात्रेलाही आजपासून सुरुवात झाली. बालताल आणि पहलगाम या दोन्ही मार्गांवरून यात्रेला पुन्हा सुरुवात झाली आहे. मुसळधार पावसामुळे गेले सहा दिवस यात्रेत खंड पडला होता. सहा हजार २६९ यात्रेकरुंचा पहिला जत्था आज सकाळी जम्मूच्या भगवती नगर यात्री निवासाहून रवाना झाला.

<><><><><>

कारगिल विजय दिनाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त लडाखमधल्या द्रास इथं आजपासून दोन दिवसीय स्मृती सोहळ्याला सुरुवात झाली. १९९९ मधे कारगिल युद्धात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी लामोचेन व्ह्यू पॉईंट इथं 'युद्ध संस्मरण' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

<><><><><>

मध्य प्रदेशात दातिया विधानसभा पोटनिवडणुकांसाठीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. भाजपनं आशुतोष तिवारी यांना, काँग्रेसनं घनश्याम सिंह तर आझाद समाज पार्टीनं दामोदर सिंह यादव यांना उमेदवारी दिली आहे.

//<><><><><>//